ISSN-2320-4
RNI No.MAHAUL03008/13/2012
Impact Factor : 2.7

# POWER OF KNOWLEDG

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journa

## SPECIAL ISSUE
## IV JAN. 2021



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

| | | |
|---|---|---|
| 26 | मराठी नाटकाचे बदलते तंत्र | डॉ.विकास बापूराव बहुले |
| 27 | 'समकालीन मराठी दलित कथेतील विद्रोही" | प्रा. युवराज धबडगे |
| 28 | दत्ता भगत यांच्या नाटकातील भाषिक परिवर्तन : एक अभ्यास | प्रा. डॉ. व्यंकट दिगंबरराव कोरेबोईनवाड |
| 29 | मराठी दलित साहित्याची सामाजिक भूमिका | प्रा.नवाजी गेंदलाल घरत |
| 30 | पाऊस पाणी : ओल्याचिंब अनुभवाचा थेट आविष्कार | प्रा.रेखा व्ही.इंगोले |
| 31 | व्यवहारभाषेतील आधुनिकीकरण | डॉ.प्रतीक्षा गायकवाड |
| 32 | 'शबरी" कादंबरीची नायिका : शबरी | प्रा.डॉ.चंद्रकांत दशरथ रुद्राक्ष |
| 33 | महात्मा फुले : विचार आणि कार्य | प्रा.डॉ.संजय मारोतराव देबडे |
| 34 | गावठाण : एक आकलन | डॉ.वैशाली भालसिंग |
| 35 | विभावरी शिरुरकर यांच्या "उमा" कादंबरीची नायिका | प्रा.डॉ.चंद्रकांत दशरथ रुद्राक्ष |
| 36 | समकालीन हिंदी उपन्यास और दलित जीवन | प्रा.खाडे विद्या बाबूराव |
| 37 | व्याकरण का उद्‌भव तथा महत्व | शिंदे प्रशांत हाबु |
| 38 | वर्तमान मानव जीवन में मूल्य शिक्षा की भूमिका | डॉ. विलास तुकाराम राठोड़ |
| 39 | सकारात्मकतेचे ऊर्जाकेंद्र-मंदिर | प्रा. डॉ. सुनिता शं. कुरूडे |
| 40 | शेतकऱ्यांचे हित जोपासणारे शिवराय | डॉ. संजय गोपालराव ठवळे |
| 41 | भारतीय संस्थानाचे भारतात विलीनीकरणाची भुमीका | प्रा. डॉ. शिवाजी लक्ष्मण नागरगोजे |
| 42 | २१ व्या शतकातील संयुक्त राष्ट्र संघाची उद्दिष्टे | डॉ. प्रा. अश्विनी अविनाश खापरे |
| 43 | धर्मांतरण व डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. तळणीकर एस. जी. |
| 44 | भारतीय प्रजासत्ताकासमोरील आव्हाने | डॉ.आण्णासाहेब हारदारे |
| 45 | वैदु समाजाची राजकीय वाटचाल | श्री.अशोक चंदर शिंदे |
| 46 | चार्लास हर्टन कुले यांची प्राथमिक गटातीला कुटुंबाची संकल्पना आणि एकविसाव्या शतकातील कुटुंबाची सदयस्थिती | डॉ. संजय सुरेवाड |
| 47 | भारतातील स्त्री-पुरुष गुणोत्तरांतील असमतोल : स्वरुप, कारणे, उपाय | प्रा.भांडवलकर बी.एन. |
| 48 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातिविषयक विचार | प्रा.डॉ. गणेश तुकाराम मोकासरे |
| 49 | वातावरणाच्या रचनेचा एक भौगोलिक अभ्यास | डॉ. बोबडे बबन्न बाबुराव |
| 50 | नैसर्गिक आपत्ती : सामाजिक परिणाम व व्यवस्थापन | प्रा. डॉ चंद्रकांत वामनराव गजेवाड |
| 51 | शरीर धारणेवर परिणामकरणारे घटक | प्रा. हेमंत त्रिंबकराव शिंदे |
| 52 | ख्याल गीतप्रकाराच्या विषयांतून घडणारे भारतीय संस्कृतीच्या विविधतेचे दर्शन | प्रा.डॉ.रवींद्र रामभाऊ इंगळे |
| 53 | महाराष्ट्र राजयामध्ये पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे व्यावस्थापन : एक भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ. घोडके जे.व्ही |
| 54 | शालापुर्व बालकांच्या कुपोषणाचा अभ्यास व उपाय | संशोधक : वर्षा अंकुश दाभाडे |

# भारतीय प्रजासत्ताकासमोरील आव्हाने

डॉ.आण्णासाहेब हारदारे
शिवराज कॉलेज, गडहिंग्लज

**प्रस्तावना :**

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत प्रदिर्घ भाषण करून संविधानाअंतर्गत स्थापित होत असलेल्या भावी राजकीय व्यवस्थेचे स्वरूप, उद्दिष्टे आणि प्रयोजन यांवर प्रकाश टाकून धर्मनिरपेक्ष, उदारमतवादी, आणि समाजवादी लोकशाहीचे प्रारूप संविधान सभेला अर्पण केले. देशात संविधानाच्या माध्यमातून २६ जानेवारी, १९५० रोजी प्रजासत्ताक लोकशाहीची स्थापना केली. पं. जवाहरलाल नेहरू यांनी २६ जानेवारी, १९३० रोजी काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनात तिरंगा फडकावून पूर्ण स्वराज्याची (स्वातंत्र्याची) घोषणा केली होती. त्याची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधान अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. तेव्हापासून आजतागायत तब्बल सात दशके आपण प्रजासत्ताक लोकशाहीचे हे प्रतिमान राबवत आहोत. आज तब्बल ७० वर्षानंतर प्रजासत्ताकाचे सिंहावलोकन करताना संविधानिक तत्त्वज्ञानाला व त्यात समाविष्ट असलेल्या मुल्यांना अनुसरून आपल्या राजकीय व्यवस्थेची निर्धोकपणे वाटचाल झाली आहे काय? असा प्रश्न विचारला तर उत्तर 'नाही' असे असेल. आज सत्तर वर्षानंतरही आव्हाने कायम आहेत. ती वस्तुस्थिती तपासली तर कोणाही सुजाण भारतीयांचे मन अभिमानाने भरून येणार नाही.

संविधानाने सुरू केलेल्या लोकशाहीचा प्रयोग विनाव्यत्यय सुरू राहीला आहे ही बाब नि:संशय गौरवास्पद आहे. मतपेटीच्या माध्यामातून संघराज्याअंतर्गत केंद्रीय स्तरावर तसेच सर्व राज्यातही सत्तांतरे घडून आली. आतापर्यंत लोकसभेसाठी १७ निवडणूका झाल्या. निवडणूक प्रक्रिया मुक्त व न्याय स्वरूपाची असावी यासाठी घटनाकारांनी ज्या संरचना घटनेत तयार केल्या होत्या त्यांनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडली असून वेळोवेळी आवश्यक होत गेलेले बदल तत्परतेने स्विकारून त्यांनी आपली कार्यक्षमता वाढवत आणली आहे. वस्तुतः त्यांच्या समोरची आव्हाने प्रचंड होती. पण अपेक्षेप्रमाणे ही आव्हाने पेलण्यात निवडणूक आयोग यशस्वी झाला. भारतीय गणराज्याचे पहिले लोकनिर्वाचीत सरकार स्थापन करण्यापासून ते अनेकानेक विधानसभांच्या निवडणूका यशस्वीरीत्या पार पाडल्या. म्हणजेच देशातला लोकशाहीचा प्रयोग पहिल्या पिढीपासून ते आजतागायत अखंड सुरू आहे. भारतीय लोकशाहीचा राजकीय सांगाडा म्हणजेच संविधानिक राजकीय व्यवस्था अभंग आहे. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या सामाजिक, आर्थिक, क्रांतीची प्रक्रिया संविधानाव्दारे घडून येणे अभिप्रेत आहे ती मात्र गतिमान झाली आहे असे दिसत नाही. मूळ प्रश्न मात्र तसेच राहीले आहेत. तीच आपल्या प्रजासत्ताकासमोर आव्हाने आहेत.



PRINCIPAL
Shivaraj College of Arts, Commerce
& D.S.Kadam Science College,
GADHINGLAJ (Dist.Kolhapur)

136

भारतीय प्रजासत्ताकांची पहिली पुर्वअट होती, समाजात कोणत्याही प्रकाराची विषमता नसावी. पण आज भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात विषमता आहे. भारतातील सर्व प्रकारच्या विषमतांचे निराकरण करणे आणि सर्व नागरीकांना समान संधी उपलब्ध करून देणे ही दुहेरी जबाबदारी पार पाडण्यासाठी संविधानकर्त्यांनी मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे या तरतुदींचा समावेश केला. क्रमशील विषमतेच्या तत्वावर अधारीत असलेल्या भारतीय समाजाला नवे लोकशाही स्वरूप देण्याच्या दृष्टीने प्रत्येक व्यक्तीला कायद्यासमोर समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण देण्यात आले. (अनु.१४) धर्म, वंश, जाती, लिंग, आणि जन्मस्थळ इत्यादी कारणासाठी नागरीकामध्ये भेदभाव केला जाणार नाही. (अनु.१५) आणि समतेच्या हक्कानुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली असून कोणत्याही स्वरूपाची अस्पृश्यता पाळण्यास मनाई करण्यात आली आहे. (अनु.१७) कोट्यावधी अस्पृश्यांना त्यांच्या युगायुगाच्या दास्यातून व सामाजिक गौणातून मुक्त करणे हा हेतू पाठीशी असलेले हे कलम समतेच्या हक्कांचे हे 'सुवर्ण कलम' म्हटले जाते. पण या तरतुदींचे अपेक्षीत क्रांतीकारकत्व अजून प्रत्यक्षात अनुभवास येताना आठवत नाही. कारण ग्रामिण जीवनात विशेष त्याने अस्पृश्यता पाळली जाते. अस्पृश्यांचा छळ करण्याचे किळसवाने प्रकार अनेक ठिकाणी होत आहेत उदा. उत्तरप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र राज्यामध्ये दलीतावरील अन्यायाची अनेक प्रकरणे आहेत. जनमानसात अद्यापही अस्पृश्यांबदलची प्रतिमा पुर्णपणे सन्मानाची बरोबरीची झालेली दिसत नाही. त्याला सुवर्ण आणि अस्पृश्य यांच्यातील आर्थिक विषयमतेची दरीच कारणीभूत आहे. आज थोड्या लोकांच्या हातात संपत्तीसंचय झाला आहे. ज्याच्याजवळ पैसा आहे ते पैशाचा वापर राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी कामगार, दलित, महिला यांच्यावर अन्याय अत्याचार करण्यासाठी वापरत आहेत. त्यामुळे जर एखाद्या दलितावर किंवा स्त्रीवर अत्याचार झालेल्याविरूध्द न्यायालयात न्याय मागण्याचा अधिकार असला तरी प्रत्यक्षात त्याचा उपयोग श्रीमंत व वरीष्ट वर्गालाच होताना दिसतो. कोर्टाची पायरी चढण्यापेक्षा गरीब, दलीत आणि स्त्री अन्याय सहन करणेच पसंद करतात. परीणामी 'कायद्याची समानता' ही फक्त कागदोपत्रीच उरते. सामाजिकदृष्ट्या विषमतेवर आधारलेला हा समाज वास्तववाद जर समतेच्या पातळीवर उतरला नाही तर डॉ. आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे जर दिर्घकालीन ही समता, साध्य झाली नाही तर भारताची राजकीय लोकशाही संकटात आल्यावाचून राहणार नाही. विषमता लवकरात लवकर नष्ट केली पाहीजे. नाहीतर विषमतेने गांजलेले लोक या घटना समितीने मोठ्या परीश्रमाने उभे केलेले हे राजकीय लोकशाहीचे मंदीर उद्ध्वस्त केल्यावाचून राहणार नाही.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य घटनादत्त आहे. आपले विचार, संवेदना आणि भावना व्यक्त करणारे हे स्वातंत्र्य नैसर्गीकही आहे. माणूस, प्राणी याचबरोबर वनस्पतीही अभिव्यक्ती जोपासतात हे विज्ञानाने सिध्द केले आहे. भारतीय संस्कृती व तत्वज्ञानातही अभिव्यक्ती स्वातंत्र्यांचे महत्त्व आधोरेखित केलेले आहे त्यामध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा, लोकशाही मूल्य अभिप्रेत आहे. आपल्याला न पटणारे विचार ऐकून घेण्याचा संमजसपणा, विवेकवादही त्यामध्ये गृहीत आहे. पण याच अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर सत्ताधाऱ्याकडून भ्याड हल्ला करणे, खोटी बदनामी करणे, भीती दाखवणे, गप्प बसायला लावणे आणि देशद्रोही ठरविणे असे प्रकार घडत आहेत. सत्य बोलण्यास बंदी घातली जात आहे. कोण काय खावे-प्यावे यावरून खून केले जात आहे. सत्तेविरोधात बोलू लागला कि त्याला देशद्रोही ठरविले जात आहे. त्यामुळे लिहणाऱ्याला व बोलणाऱ्याला प्रत्येकाला खरे एवजी बरे लिहावे व बोलावे लागत आहे. विवेकवाद आणि सद्भावना संपल्याचे दिसून येत आहे. द इकॉनॉमिस्ट इंटलिजन्स युनिट (ईआययु) च्या वत्तीने २०१९ या वर्षातसाठी लोकशाही निर्देशांकाची क्रमवारी जारी करण्यात आली असून सध्य:स्थितीत भारतीय लोकशाही निर्देशांकात भारताची १० अंकानी घसरण झाली असून आता ५१ स्थानापर्यंत खाली आला आहे. निवडणूक प्रक्रिया, विविधता, सरकारची कामकाज पध्दती, राजकीय सहभाग, राजकिय संस्कृती व नागरी स्वातंत्र्य या घटकांचा विचार केला जातो. गेल्या वर्षामध्ये जनआंदोलने, नागरीकांचा सरकारी धोरणाप्रती असलेला विरोध यांच्यामुळे जगभरामध्ये भारताची प्रतिमा बदलत असल्याचे बोलले जाते. आणि भारताची लोकशाही निर्देशकातील घसरणीस 'नागरी स्वातंत्र्याचा संकोच' कारणीभूत आहे असे म्हटले आहे. नागरी स्वातंत्र्याचा संकोच हा भारतीय प्रजासत्ताकासमोरील मोठे आव्हान आहे. हे वास्तव आपण समजून घेण्याची गरज आहे.

सध्याचा सरकारचा असा समज आहे कि बहुमताचे राज्य म्हणजे लोकशाही, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असे मत होते कि खऱ्या लोकशाहीत/लोकशाही व्यवस्थेत सर्व निर्णय सहमतीने घेतले जावेत. प्रत्येक वेळी कोणत्याही निर्णयावरून एकमत झाले नाही. तर बहुमताने निर्णय घ्यावे. बहुमत हे ज्यावेळी एकमत होणे अशक्यच असेल त्यावेळी योग्य आहे पण प्रत्येक वेळी बहुमताने निर्णय घेणे घातक असते. ज्यादेशातील अल्पमतातील लोकांना व अल्पसंख्याकांना योग्यरीत्या राबवले जात नाही त्या देशाला खरा लोकशाही देश म्हणता येणार नाही. सध्याचे सरकार केवळ सभागृहातील संख्यात्मक बहुमतावर संवैधानिक प्रथा, परंपरा, राजकिय नैतिकता पायदळी तुडवत आहे. तसेच भारतातील लोकशाही ही केवळ बहुमताचीच लोकशाही नसून ती जातीय व धार्मिक लोकशाही आहे. जातीय किंवा धार्मिक लोकशाही म्हणजे अशी लोकशाही ज्यामध्ये निवडणूकांत लोक इतर कोणताही विचार न करता आंधळेपणाने आपल्याच जातीच्या व धर्माच्या उमेदवाराला मतदान करतात त्यामध्ये उमेदवाराची गुणवत्ता व विचारसरणी महत्वाची नसते. भारतात बहुमतानी व जातीय बहुसंख्याची दुहेरी हुकूमशाही कार्यरत आहे. जनतेला गृहीत धरण्याचे व विरोधकांचे महत्त्व नाकारण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. लोकशाहीचा तात्वीक अर्थ लोकांची संमती आणि सहमती हाच असतो. बहुमताचा आधार घेणे हे त्या संमतीची व्यवहारात आंमलबजावणी करण्याचे एक हत्यार झाले, पण म्हणून बहुमत = लोकशाही असे समिकरण मांडणे जरा जास्तच अतिशयोक्त होईल. त्यामुळे बहुमत हा लोकशाहीच्या मार्गातील एक टप्पा आहे ते अंतिम ध्येय नाही ही वस्तुस्थीति लक्षात घेऊन बहुमतवाल्या लोकशाहीचे/राजकारणाचे आव्हान संपुष्टात आणले पाहीजे. लोकशाही ही केवळ एक राजकीय प्रणाली नसून सामाजिक सहजीवनाची प्रक्रिया आहे हे गृहीत धरून राज्यकर्त्यांनी वाटचाल केली पाहीजे.

लोकशाहीत संविधानिक नैतिकता किंवा नितीमत्ता महत्त्वाची असते व तिची पायाभरणी आपणास चांगली संस्कृती, चांगल्या परंपरा आणि राजकीय संकेत स्थापन करून करावी लागते. मानवी जीवनाच्या सर्वांगीन परीवर्तनात राजकीय ध्येय

धोरणात योगदान फार मोठे असते राजकीय स्वार्थासाठी नैतिकतेत बळी देऊन संधीसाधू व संकुचीत राजकारण करणे यामध्ये बसत नाही. संविधानिक नैतिकतेचे सध्याचे पक्षांतर बसत नाही. निवडून येण्यासाठी केलेले गैरप्रकार आणि धार्मिक व जातीय भावनेने केलेले मतदान बसत नाही. पण सध्याचे राजकारण हे सांस्कृतिक राष्ट्रवादाचा बिगुल वाजवून केले जात आहे. सर्व स्वायत्त संस्थाचे व्यक्तीगीकरण अनाकलनीय व लोक तुघलकी निर्णयप्रक्रिया या व अशा अनेक बाबतीत कमालीची असैविंधानिकता दिसून येत आहे. कारण सरकारचे नोटाबंदीसारखे अनेक अनाकलनीय निर्णय ढासळता विकासदार, वाढती बेरोजगारी, वाढत्या आत्महत्या, स्वायंत्र्य संस्थांचे सरकारीकरण आणि सरकारी संस्थांचे खाजगीकरण आणि सामूहिकरित्या केल्या जाणाऱ्या हत्या अशा विविध कारणांनी सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थिती चिंताजनक असताना भावनिक आव्हाने व सांस्कृतिक राष्ट्रवादाचा सत्तेच्या राजकारणासाठी वापर केला जात आहे. समतेच्या आर्थिक क्रांतीचे दिवस जवळ आले असताना त्याला बाजूला करून सांस्कृतिक आस्मितेचे प्रश्न चर्चेत ठेवले जात आहेत. महाराष्ट्रातील घडामोडीने तर संविधानिक नैतिकतेला न्यायालयात उभे केले. महाराष्ट्राच्या राज्यपालानी निर्णय घेत असताना कायदा व संविधानाला धरून आणि अस्थिर परीस्थीतित सद्विवेक-बुद्धीला अनुसरून निर्णय घेत अपेक्षित असते. तसे न वागता राज्यपाल हे केंद्राचे हस्तक असल्यासारखे वागले. महाराष्ट्राच्या प्रकरणामध्ये संविधानिक नैतिक मुल्ये बाजुला सारून राष्ट्रपती आणि राज्यपाल यांनी विशिष्ट राजकीय पक्षाचे हस्तक असल्याचा संदेश देशाला गेला आहे. संविधानिक मुल्ये नाकारण्याची विकृती वाढण्याचे आणि सभागृहातील चुकीचा अर्थ लावण्याचे प्रयत्न सत्ताधारी राजकीय पक्षाच्या उक्ती आणि कृतीतून दिसत आहे. समाजातील विषमता व्यक्तीला आपल्या अंत:प्रत्ययाची प्रामाणिक मांडणी करण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी, संविधानिक नैतिकता व सार्वजानिक नीतीविवेक यांचा अभाव, परात्म भाव बद्दल असणारी असहिष्णुता आणि बहुमताच्या जोरावर आपले म्हणणे रेटून नेणे इत्यादी आव्हाने आपल्या प्रजासत्ताक लोकशाहीला प्रभावीत करीत आहेत. त्यामुळे असे म्हणता येईल की भारतीय समाजात आपण फक्त राजकीय लोकशाही प्रस्थापित करू शकलो पण लोकशाहीचे मूल्य अजून रूजलेले नाही.

थोडक्यात संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाची अंमलबजावणी करताना ज्या लोकशाही राज्यव्यवस्थेच्या १) समाजात विषमता नसावी. २) कायद्यासमोर सर्व समान आहेत. ३) बहुमताचे राज्य म्हणजे लोकशाही नव्हे आणि ४) सार्वजनिक नैतिकता किंवा सार्वजनिक नितीविवेक या पूर्व अटी सांगितल्या होत्या. तीच आज आपल्या प्रजासत्ताकासमोरील आव्हाने आहेत. त्यावर मात करणे हे आपणा भारतीयांचे परम कर्तव्य आहे.

◆◆◆



137